नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २९/०५/२०२५ (गरूवार)**

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द २ गुन्हे नोंद , ८८ लाख ५१ हजारांचा मुद्देमाल जप्त, उमरेड पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन उमरेड** :—दिनांक २८/०५/२०२५ रोजी उमरेड पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैध रित्या रेतीची चोरटी वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी खालील प्रमाणे कारवाई केली.

**कारवाई क्रं १ :—** पोलीसांनी डिमर्सी हॉटेल ,बायपास उमरेड येथे नाकाबंदी केली असता अशोक लेलॅन्ड कंपनीचा १२ चक्का टीप्पर क्र. एम.एच.४९ बी. झेड. ५६०२ हा येताना दिसला. वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. वाहन चालक आरोपी **दिपक तेजराम मानापुरे रा. प्लॉट नं. न्यु ज्ञानेश्वर नगर मानेवाडा रोड पार्वती नगर नागपूर** हा मिळुन आल्याने त्याला रेती वाहतूकीच्या परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याने कोणताही परवाना नसल्याबाबत सांगितले. **वाहन मालका बाबत विचारपुस केली असता नमुद वाहन त्याच्याच मालकीचे असल्याबाबत माहीती पोलीसांना प्राप्त झाली.** पोलीसांनी पंचासमक्ष **१)** अशोक लेलॅन्ड कंपनीचा १२ चक्का टीप्पर क्र. एम.एच.४९ बी. झेड. ५६०२ किमती ४५,००,०००/—रूपये **२)** ८ ब्रास रेती किंमती २४,०००/— रूपये असा एकुण ४५,२४,०००/—रूपयेचा माल जप्त करण्यात आला आहे.

**कारवाई क्रं २ :—** पोलीसांनी बाबा सावजी भोजनालय जवळ, बायपास रोड, उमरेड येथे नाकाबंदी केली असता अशोक लेलॅन्ड कंपनीचा १२ चक्का टीप्पर क्र. एम.एच. ४९ सी.एफ. ९३५७ हे वाहन मिळुन आले. वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. वाहन **चालक मुरलीधर पुंडलिकराव कडू, रा. प्लॉट क्र. ५३, विदया हाउसिंग**

**सोसायटी बेसा, पिपळा रोड, नागपूर** हा मिळुन आल्याने रेती वाहतूकीच्या परवान्याबाबत विचारपुस केली असता त्यांच्या कडे कोणताही परवाना नव्हता. वाहन मालकबाबत विचारपुस केली असता वाहन मालका बाबत विचारपुस केली असता **नमुद वाहन त्याच्याच मालकीचे असल्याबाबत माहीती पोलीसांना प्राप्त झाली.** पोलीसांनी पंचासमक्ष १) अशोक लेलॅन्ड कंपनीचा १२ चक्का टीप्पर क्र. एम.एच. ४९ सी.एफ. ९३५७ किंमती ४३,००,०००/— रूपये २) ९ ब्रास रेती किंमती २७,०००/— रूपये असा एकुण ४३,२७,०००/रूपयेचा माल जप्त करण्यात आला आहे.

**दोन्ही कारवाईत दोन वाहनासह १७ ब्रास रेती असा एकुण ८८,५१,०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.**

**नमुद चालक /मालक आरोपीतांविरूध्द कलम ३०३(२) भा.न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सहकलम ४, २१ खाण खनिज अधिनियम, सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंध अधिनियम, सहकलम १५ पर्यावरण संरक्षण अधिनियम अन्वये २ गुन्हे दाखल करण्यात आले आहे. दोन्ही आरोपीतांना पोलीसांनी अटक केली आहे.**

## अंमलीपदर्थाची विक्री करणाऱ्या आरोपी विरूध्द गुन्हा नोंद,आरोपी अटक
## स्थानिक गुन्हे शाखा,नागपुर ग्रामीण यांची कारवाई

दिनांक २८/०५/२०२५ स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण चे पथक पोलीस स्टेशन कळमेश्वर हद्दीत अवैध धंदयावर कारवाई कामी पेट्रोलींग करीत असतांना पोलीसांना गुप्त बातमीदाराने खात्रीशीर माहीती दिली की, सागर लंगडे, रा. फेटरी हा फेटरी उडाण पुलाखाली बुलेट मोटर सायकल ने फिरून अंमली पदार्थ गांजा बाळगुन गांजाची विक्री करत आहे. मिळालेल्या महीतीच्या आधारे पोलीसांनी घटनास्थळी जावुन सापळा रचुन अरोपी नामे **सागर सुरेश लंगडे, वय २६ वर्षे, रा. वार्ड क्र २, फेटरी ता. जि. नागपुर** याला ताब्यात घेवुन त्याची पंचासमक्ष अंगझडती घेतली असता नमुद आरोपीचे ताब्यात **अंमली पदार्थ गांजा मिळुन आला . पोलीसांनी नमुद आरोपीच्या ताब्यातुन १) २६ ग्राम वाजनाचा अंमली पदार्थ गांजा किंमती २,६००/—रुपये, २) रोख रक्कम ८०० /— रूपये , ३) एक काळया रंगाची रॉयल इनफिल्ड**

**मोटर सायकल क्रमांक एम.एच. ४९ एस ९८३१ आणि ४) एक ॲपल कंपनीचा मोबाईल असा एकुण १,३१,०६५ रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आला आहे.**

**आरोपी नामे सागर सुरेश लंगडे, वय २६ वर्षे, रा. वार्ड क्र २, फेटरी, ता. जि. नागपुर याच्या विरूध्द एन. डी. पी. एस. कायदयान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास कळमेश्वर पोलीस करत आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे.**




## अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या १८ आरोपीतांविरूध्द एन.डी.पी.एस कायदयान्वये १८ गुन्हे नोंद

नागपुर ग्रामीण जिल्हयाअंतर्गत **दिनांक २८/०५/२०२५** रोजी पोलीसांनी गुप्तबातमीदाराच्या महीतीच्या आधारे पेट्रोलींग करून अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूध्द खालील प्रमाणे गुन्हे नोंद केले आहे.

**पोलीस स्टेशन कन्हान** :— कन्हान पोलीस पेट्रोलींग करीत असतांना त्यांना आरोपी नामे क्रमांक १) मोहम्मद शाबिर शहजाद शेख, वय २८ वर्षे ,रा. कामठी कॉलरी नं ३ कन्हान, हा मौजा खदान क्रं ३ येथे अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. आरोपी क्रं २)

नामे आदित्य अखिलेश राय, वय १९ वर्षे, रा. खदान नं ३ कन्हान हा मौजा खदान येथे अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. आरोपी क्रं ३) नामे मोहम्मद साहील शहीद अंसारी, वय २० वर्षे ,रा. खदान नं ३, मडीबाबा कन्हान हा टेकाडी गोंडेगाव कन्हान येथे अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला.आरोपी क्रं ४) नामे श्रुतिक महेश तिवारी वय २४ वर्ष रा.कामठी कॉलनी नं ०३ पुराना क्वाटर नं ०७ हा मौजा फुकट नगर येथे अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला.तसेच क्रं ५) विधीसंघर्षग्रस्त बालक हा खदांन नं ३ ओपन कास्ट कडे जाणारे रोड चा बाजुला आणि क्रं ६) विधीसंघर्षग्रस्त बालक हा मौजा शिवनगर येथे अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आले. वर नमुद अंमली पदार्थ सेवन करणाऱ्यांवर पोलीस स्टेशन कन्हान येथे ६ गुन्हे नोंदण्यिात आले आहे.

**पोलीस स्टेशन खापरखेडा :—** खापरखेडा पोलीस पेट्रोलींग करीत असतांना त्यांना आरोपी नामे अक्षय भैय्यालाल पवार, वय २८ वर्षे, रा. वार्ड नं ६ चनकापुर हा चनकापुर ग्रांउंड येथे अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला.

**पोलीस स्टेशन अरोली** :— अरोली पोलीस पेट्रोलींग करीत असतांना त्यांना आरोपी नामे अक्षय महाविर डेकाटे, वय १९ वर्षे, रा. अरोली हा अरोली येथे अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला.

**पोलीस स्टेशन रामटेक** :— रामटेक पोलीस पेट्रोलींग करीत असतांना त्यांना आरोपी नामे सुधीर रामदास सोमकुवर, वय ५२ वर्षे, रा. वार्ड क्र ०५, कांद्री माईन, ता. रामटेक हा मौजा कांद्री माईन, रामटेक येथे अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला.

**पोलीस स्टेशन बोरी** :— बोरी पोलीस पेट्रोलींग करीत असतांना त्यांना आरोपी रणजितसिंह रामसिंह ठाकुर, वय ५८ वर्षे, रा. प्लॉट नं १४ वार्ड नं ६, बुटीबोरी, ता. जि. नागपुर हा मौजा बोरी येथे अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला.

**पोलीस स्टेशन देवलापार** :— देवलापार पोलीस पेट्रोलींग करीत असतांना त्यांना आरोपी संदीप प्रेमलाल नवरेती, वय २२ वर्ष , रा.आगरी, पोस्टे सिधेरिया ,ता.कुरई जि.सिवनी मध्यप्रदेश हा मौजा सावरा फाटा येथे अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला.

**पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी :—** एमआयडीसी बोरी पोलीस पेट्रोलींग करीत असतांना त्यांना आरोपी दिनु बहुरराम शाहु, वय २८ वर्षे ,रा. राजुर कॉलनी, ता. वणी जि. यवतमाळ हा मौजा टेंभरी मोरारजी कंपनी कडे जाणारा रोड येथे अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला.

**पोलीस स्टेशन बेला :—** बेला पोलीस पेट्रोलींग करीत असतांना त्यांना आरोपी क्रमांक १. नामे शुभम विलास दोडके वय २४ वर्षे, रा वार्ड क्र. ०६ बुटटीबोरी, ता, जि, नागपुर हा सोंनेगाव टी पॉइंट येथे अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला, आरोपी क्रं २ नामे बादल धनराज पांडे, वय २८ वर्षे, रा. वार्ड नं ०३ सिर्सि, ता. उमरेड, जि. नागपुर, हा मौजा सिर्सि येथे अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला.

**पोलीस स्टेशन केळवद :—** केळवद पोलीस पेट्रोलींग करीत असतांना त्यांना आरोपी क्रमांक १. नामे देवनाथ शेषरावजी साबळे, वय ४३ वर्षे ,रा. वार्ड नं १ पाण्याचे टाकीजवळ, आष्टी बु. ता. सावनेर आणि आरोपी क्रं २ नामे रामजीवन वासुदेव राजपुत, वय ३६ वर्षे ,धंदा—मजुरी रा. वार्ड नं २, रायबासा. ता. सावनेर हे दोघे हा केळवद ते हत्तीस जाणाऱ्या रोड लगत अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आले.

**पोलीस स्टेशन सावनेर :—** सावनेर पोलीस पेट्रोलींग करीत असतांना त्यांना आरोपी नितीन ज्ञानेश्वर सूर्यवंशी, वय ३८ वर्षे ,रा. वार्ड क्र. १४ चिचपूरा , माताखेडी मंदीर जवळ , सावनेर हा स्मशान भूमी, चिचपूरा सावनेर येथे अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला.

**पोलीस स्टेशन काटोल:—** काटोल पोलीस पेट्रोलींग करीत असतांना त्यांना आरोपी श्याम गोपालराव शिर्वे, वय ६० वर्षे, रा. अन्नाभाउ साठे नगर, काटोल हा संगमा नगर येथे अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला.

**नागपुर ग्रामीण जिल्हयाअंतर्गत अंमली पदार्थ सेवन करणाऱ्या वर नमुद एकुण १८ आरोपीतांवर कलम २७ एन.डी.पी.एस. कायदयान्वये १८ गुन्हे नोंद करण्यात आले आहे.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने